R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५

दि. ११ डिसेंबर २०२५, वार : गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध - राज्यपाल आचार्य देवव्रत

नागपूर: नागरिकांना त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या समजावून सांगण्यासाठी अत्यंत सुंदर अशी संविधानिक चौकट भारतीय संविधानाने आखून दिलेली आहे. बंधुत्व आणि लोकशाहीचा भाव संविधानात आहे. संविधानाने समाजाला, राष्ट्राला जोडण्याचे काम केले. सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.



भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विषयावर २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुस्तक स्वरूपात आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते लोकभवन येथे प्रकाशित करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे या पुस्तकाचे संकलन आणि संपादन करण्यात आले आहे.

पुस्तक प्रकाशनप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील तसेच मंत्रिमंडळ व विधिमंडळ सदस्य उपस्थित होते.

राजभवनचे नामकरण लोकभवन झाले आहे, याचा आनंद आहे. आज भारत जगातील दुसरी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे आपला देश आता वेगाने विकसित होत आहे. संविधानातील बारकावे या पुस्तकातून जाणून घेता येईल. इतर भाषेतही या पुस्तकाचा अनुवाद व्हावा, असे राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले.

सर्वांगीण विचार करून संविधानाची निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भारतीय संविधान हे जगातील एक सर्वोत्तम संविधान आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा विविध संस्थानांमध्ये विभाजित होता. देशात सांस्कृतिक ऐक्य होते, मात्र राजकीय ऐक्य नव्हते. त्यामुळे सर्वांना एकत्र करत सर्वांगीण विचार करून संविधान तयार करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान मूल्य जपणाऱ्या विविध देशाच्या लोकशाहीचा अभ्यास केला, आणि आपल्या देशातील शाश्र्वत मूल्यांवर आधारित संविधान निर्मिती केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुस्तक प्रकाशनप्रसंगी म्हणाले.

संविधानाने सर्वांना संधीची समानता दिली. संविधानिक व्यवस्था आपल्याकडे कुणीही केंद्रीत करू शकत नाही. देशातील अनेक खटल्यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संसद आणि न्यायालयाचे अधिकार परिभाषित केले आहेत. पुस्तक वाचल्यानंतर सर्वसामान्य माणूस देखील भारताचे संविधान व त्याची मूल्ये समजू शकेल, असे ते म्हणाले. यापूर्वी 'बजेट कसे असावे' हे पुस्तक अतिशय सोप्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. संविधान हे सोपे आहे, क्लिष्ट नाही हे सांगण्याचा पुस्तकाच्या माध्यमातून प्रयत्न केला. आता ते पुस्तक स्वरूपात उपलब्ध होणार असल्याचा आनंद असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले.

इतर भाषेतही पुस्तकाचा अनुवाद व्हावा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

संविधानाची माहिती अत्यंत सोप्या भाषेत नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे पुस्तक निश्र्चितच उपयुक्त ठरणार आहे. अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणावर आधारित हे पुस्तक अत्यंत सोप्या भाषेत संविधान सर्वांपर्यंत पोहोचवेल. विधिमंडळाची गौरवशाली परंपरा आहे. ही परंपरा अनेक वर्षापासून जपण्यात आली आहे. अनेक देशांकडे आपआपले संविधान आहे. मात्र आपले संविधान हे समाजाचा सर्वांगीण विचार करणारे आहे. या पुस्तकाचा अनुवाद इतर भाषेतही व्हावा, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

श्री.फडणवीस हे संविधान समजून घेणारे आणि पुस्तक रूपात मांडणारे मुख्यमंत्री आहेत. सर्वच विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास असतो. बजेटवर त्यांनी अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे. आज प्रकाशित होणारे पुस्तक अनेकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. राज्यशास्त्राचे विद्यार्थी, लोकनेते, नागरिक सर्वांनी हे पुस्तक संग्रही ठेवावे, असेच आहे.

संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील - विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर

जनसामान्यांना सोप्या शब्दात संविधानाची माहिती व्हावी, यासाठी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या भाषणाची पुस्तक रूपात ओळख होण्याची गरज होती. या पुस्तकाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील, असा विश्र्वास विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी आपल्या प्रस्तावनेत व्यक्त केला. या पुस्तकातून संविधानातील तरतुदीची माहिती मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

विधानसभेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आभार मानले. लोकभवन नामकरण झाल्यानंतर संविधानावर आधारित पुस्तक प्रकाशन सोहळा लोकभवन येथे आयोजित करण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, राज्यशास्त्राचा अभ्यासकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल. अतिशय सोप्या भाषेत हा संदर्भग्रंथ सर्वांना निश्र्चित उपयोगी ठरेल, असे प्रा.शिंदे यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या पुस्तकाची प्रत विधिमंडळाच्या ु.ाश्री.ीस. ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे.

कार्यक्रमादरम्यान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. तसेच मुख्यमंत्र्यांच्या आतापर्यंतची वाटचाल अधोरेखित करणारी ध्वनिचित्रफित यावेळी दाखविण्यात आली.

## बांधकाम कामगार कार्यालयाचा ढिसाळ कारभार.

लातूर /प्रतिनिधि-बांधकाम कामगारांच्या



हितास्तव शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात मात्र या योजना बऱ्याचदा एज़ंट, दलालांमार्फत राबविल्या जात असल्यामुळे खरा लाभार्थी मात्र दुर्लक्षितच राहतो आहे. हाच एक चिंतनशील प्रश्न बनला आहे. त्यातच कौशल्य विकास वृद्धी कामगार प्रशिक्षण योजना संदर्भात रितसर निवेदन देऊन, मागणी करूनही लातूर कामगार कार्यालयाच्या वतीने शहरी आणि ग्रामीण भागातील वडार जमातीला ही योजना नाकारली यातून लातूर कामगार आयुक्तांचा कर्तव्यपराडमुखता तसेच सहाय्यक कामगार आयुक्त यांचा खोडसाळपणा दिसून येतो. यामुळे लातूर जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त यांच्यावरती गुन्हा दाखल करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भटक्या- विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्रीकांत मुद्दे म्हणाले की, सरकार म्हणते शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा मात्र लातूरच्या बांधकाम कामगार सहाय्यक आयुक्तांची कृती मात्र याच्या उलट असलेली दिसून येते. कौशल्य वृद्धी विकास कामगार प्रशिक्षण योजना ही योजना चालू होण्याच्या आधीपासून वडार समाज संघाच्या वतीने निवेदनाद्वारे आयुक्तांकडे सातत्याने मागणी करण्यात आली होती. तसेच कामगारांची यादी सुद्धा देण्यात आली होती. मात्र वारंवार मागील चार महिन्यांपासून कामगार कार्यालयाचे हेलपाटे मारल्यानंतरही आयुक्त साहेब यांनी दिलेल्या निवेदनावरती काहीच कार्यवाही केली नाही. कंत्राटदार म्हणतो, वडार जमातीतील यादीस कामगार आयुक्त योजनेस मंजुरी देत नाहीत. तेव्हा आम्ही प्रशिक्षण योजना कशी राबवायची? संवैधानिक पदावरील व्यक्तीकडून जर जे खरे लाभार्थी आहेत, शासकीय योजनांपासून कोसो दूर आहेत, अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित घटकांसाठीची असलेली योजना नाकारणे म्हणजे संविधानातील हक्क, अधिकार आणि मूल्यांची पायमल्ली करणे होय.

याच्या आधीही कामगारांसाठी राबवल्या जाणाऱ्या सुरक्षा संच आणि भांडी संच याचे वडार वस्तीत कॅम्प घेऊन मोफत वाटप करावे यासाठीदेखील निवेदनाद्वारे सातत्याने मागणी करण्यात आली होती. मात्र आयुक्त साहेबांनी त्यांच्या मर्जीतील लोकांना अनेक भागात तारीख देऊन कॅम्प घेतले मात्र वडार वस्तीत कॅम्प घेण्यास तारीख दिली नाही. त्याचप्रमाणे वडार जमातीतील कामगार नोंदणी अर्ज आणि शिष्यवृत्ती अर्ज काही बोटावर मोजण्या इतकेच कामगार अर्ज दाखल करतात. मात्र या अर्जांचाही दहा ते बारा महिने झाले तरी असे अर्ज निकाली काढले जात नाही. शेवटी काहीना काही त्रूटी काढून लाभ कसा नाकारला जातो, याचे कार्यालयातील अधिकारी आणि कामगार आयुक्त यांना निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील यावर कसलीच कार्यवाही करण्यात आली नाही. याला काय म्हणावे? अशा अनेक योजनांविषयी मागील चार वर्षापासून निवेदने देऊनही वडार समूहातील कामगारांना फसवण्याचे काम कामगार कार्यालय करत आले आहे. हे पुराव्यानिशी दाखवून देऊ. असेही यावेळी म्हणाले.

लातूर जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्तांचे वारंवारचे म्हणणे आहे की, वडार जमातीला योजना मिळवून देऊ, रितसर मागणी करा, टाळाटाळ करणे, कोटा संपला आहे म्हणणे, दादागिरीची भाषा करणारा अधिकारी वडार समाजातील कामगारांचे प्रश्न सोडवेल का? हाच चिंतनशील प्रश्न बनला आहे. कामगार म्हणून वडार समाजाच्या योजनांना मंजुरी देत नसतील तर संबंधीत कामगार आयुक्त यांच्यावर बांधकाम कामगार लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यास नकार दिल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच या योजनेची सखोल चौकशी करण्यात यावी आणि लातूरचा कामगार कारभारी बदलावा तसेच सदर निर्णय शासन निर्देश, बांधकाम कामगार कल्याण मंडळ नियम व प्रशासनिक प्रक्रियेचे उल्लंघन करणारा आहे. नियमांनुसार योजनेस नकार देताना योग्य कारण लेखी स्वरूपात देणे बंधनकारक असते. मात्र तसे न झाल्याने निर्णय मनमानी स्वरूपाचा वाटतो. सदर प्रकरण गांभीर्याने घेऊन योग्य ती कारवाई करून न्याय मिळवून द्यावा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. याप्रसंगी रमाकांत मुद्दे, कृष्णा धोत्रे, सचिन वाडीकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम आणि कन्व्हेंशन सेंटरची डागडुजीलवकरात लवकर पूर्ण करा - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

नागपूर, : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम आणि कन्व्हेंशन सेंटरच्या डागडुजीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे दिले.



कामठी मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर येथील सभागृहात आज बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. उत्तर नागपूरचे आमदार नितीन राऊत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक संचालक (वित्त व लेखा) अतुलकुमार वासनिक, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता संजय चिमूरकर, आणि नरेश लभाने, अभियंता आशिष तामगाडगे आदी उपस्थित होते.

ऑडिटोरियम हॉलच्या बाल्कनी भागातील शीतवाहक डक्ट, शीतवाहक यंत्रणेच्या पाईप्सचे इन्स्युलेशन, कॉन्फरन्स रुममधील एअर हँडलिंग युनिट, व्हीआयपी गेस्ट रूम, डिझेल जनरेटर, एक्झिट गेटकडील पाण्याच्या भूमिगत टाकीला वॉटर प्रूफिंग, बेसमेंट पार्कींग आदींची चर्चा बैठकीत करण्यात आली. ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री श्री. शिरसाट यांनी यावेळी दिले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४० फुट उंचीचा पुतळा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## लाडक्या बहिणींच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री फडणवीसानी अभिमन्यू पवारांना झापले लहेज़रीं विरोधात गेलात तर घरी बसावं लागेल!

नागपूर :- विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात लाडक्या बहिणी योजनेवरून चर्चा रंगत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्यात तीव्र शब्दांचे वार-पलटवार झाले.





योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींवर अभिमन्यू पवार यांनी लक्ष वेधले. पवारांच्या या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीसांनी कडाडून प्रतिक्रिया देत स्पष्ट इशारा दिला-लाडक्या बहिणींच्या विरोधात गेलात, तर घरी बसावं लागेल!मुख्यमंत्र्यांच्या या वक्तव्याने सभागृहात क्षणभर गदारोळाचे वातावरण निर्माण झाले. सत्तापक्षाच्या बाकांकडून टाळ्यांचा आवाज घुमला, तर विरोधकांनी तत्काळ नाराजी व्यक्त केली.फडणवीस यांनी पुढे स्पष्ट केले की महिलांच्या हितासाठी राज्य सरकार ही योजना प्रामाणिकपणे राबवत आहे आणि योजनेला राजकीय कारणांनी विरोध करणे म्हणजे महिलांच्या हक्कांना बाधा आणणे होय.


पवारांनी मांडलेल्या अडचणींबाबत सरकार गंभीर असून सुधारणा केल्या जातील, पण योजनेविरोधी भूमिका स्वीकारली जाणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षांच्या मध्यस्थीनंतर कार्यवाही सुरळीत सुरू झाली, मात्र फडणवीसांच्या विधानाने राजकीय वर्तुळात चर्चेला जोर आला आहे.

## संपादकीय...

# लाडकी बहीण

राजकीय भगिनीभावाचा ढोंग आणि नागपूर अधिवेशनाचे उघडे पडलेले वास्तव नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात राज्याचे संपूर्ण राजकारण जणू एका वाक्याच्या गुलामासारखे वागताना दिसले–'लाडकी बहीण'. एका शब्दप्रयोगाने असा गोंधळ उडाला की लोकप्रतिनिधींनी राज्याच्या १२ कोटी नागरिकांना दिलेले आश्र्वासन, त्यांच्या मुलभूत समस्यांचा अजेंडा, आणि महत्त्वाची विधिमंडळीय कामे सर्व काही गाळात गेले. या नाट्यमय गोंधळाच्या केंद्रस्थानी होते–उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विधानसभेतील आमदार अभिमन्यू पवार. परंतु खरा प्रश्र्न हा: हा वाद उफाळला तो राजकीय स्वाभिमानासाठी की सोयीस्कर धुरळा उडवण्यासाठी? राजकारणात शब्दांचा स्फोट तेवढाच–पण मुद्द्यांवरचा मूक–प्रहर का? अभिमन्यू पवार यांनी केलेल्या विधानाचा अर्थ काहींना अनुचित वाटू शकतो–आणि त्यावर चर्चा करायलाच हवी. पण या चर्चेचा तडाखा असा बसावा की संपूर्ण अधिवेशन ठप्प? हे हास्यास्पद आहे. हे राजकीय नैतिकतेचे रक्षण नसून, नैतिकतेचा ढोंग आहे. ज्यांना शेतकऱ्यांच्या मृत्यूंबद्दल विचारताना नेमके शब्दही जमत नाहीत, ज्यांना महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या सामान्य जनतेच्या वेदना दिसत नाहीत, त्यांना एका शब्दाच्या अर्थावरून ज्वाला पेटवण्याची कला मात्र उत्तम अवगत. हे संतापाचे नाटक आहे, आणि नाटकाची भाषा आहे–राजकीय अभिनयाचा अतिरेक. सत्ताधारी व विरोधक–दोघांचेही राजकारण एकाच रंगमंचावर या वादात एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दोघेही प्रतिक्रियांच्या स्पर्धेत उतरले. एक जण सत्तेच्या प्रतिष्ठेची काळजी घेत असल्याचे दाखवितो, तर दुसरा राजकीय 'शिष्टाचार' शिकवण्याचे नाटक करतो. पण दोघांचेही मूळ उद्दिष्ट विखुरलेले लक्ष परत स्वतःकडे ओढून घेणे हेच. विरोधकांनीही संधी साधून अधिवेशन गोंगाटाचा मैफिलीसारखे रंगवले. शब्दप्रयोगांचा वाद–दोन्ही बाजूंच्या नेत्यांसाठी राजकीय ऑक्सिजन; पण जनतेसाठी घातक प्रदूषण. लोकशाहीच्या सभागृहाचे रूपांतर–गोंधळ, घोषणाबाजी आणि नाटकाचा महामेघ विधानभवन हे लोकशाहीचे मंदिर म्हणतात. पण आज ते राजकीय बंडलांचा बाजार वाटते. जिथे मुद्दे विकले जातात आणि समस्यांची उपेक्षा होते. मुद्द्यांवर बोलताना आकडे, तथ्ये, उत्तरदायित्व–हे सर्व सोबत आणावे लागते. पण एका शब्दप्रयोगावरून भांडताना काय लागतं? फक्त जोराचा आवाज, बनावटी संताप आणि राजकीय स्टेजची भूक. हे प्रत्येकाला सहज जमते. राजकारणी हा मार्ग का निवडतात? कारण हे सर्वांत सोपे–आणि सर्वांत निष्क्रीय. खरे प्रश्र्न कोण विचारणार? राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहेत तरुण बेरोजगारांची रांग लांबत आहे महागाई सामान्य माणसाच्या आक्रोशाला बधिर करते महिला सुरक्षेचे आकडे राज्याच्या प्रतिमेवर काळे डाग बनले आहेत उद्योगपती राज्याबाहेर गुंतवणूक नेत आहेत पायाभूत सुविधा कोसळत आहेत यांवर चर्चा हवी होती. पण सत्ता आणि विरोधकांनी मिळून हा संपूर्ण अजेंडा एका 'लाडक्या बहिणी'च्या राजकीय प्रतिमेखाली गाडून टाकला. अधिवेशनात महाराष्ट्राचा भविष्यासंबंधी एकही निर्णायक पाऊल पडत नसताना, नेते भावनिक गोंधळात मश्गूल. हीच खरी शोकांतिका. निष्कर्ष : महाराष्ट्राला लाडक्या बहिणीचा वाद नको–कठोर, सक्षम नेतृत्व हवे या वादाचे सार एकच–शब्दांवरून बंड; पण समस्यांवरून शांतता. भावनिक आक्रमण; पण वास्तवाच्या प्रश्र्नांवर पळवाट. अजित पवार, एकनाथ शिंदे, अभिमन्यू पवार– तीघांच्या नेत्यांनी फक्त एकच सिद्ध केले: राजकारणात मुद्दे निग्रहाने बोलण्याची हिंमत कमी झाली आहे; आणि नाटक करण्याची तयारी वाढली आहे. राज्याला आज राजकीय बहिणींच्या वा भावांची नव्हे– खऱ्या अर्थाने जबाबदार, अभ्यासू, आणि निर्णयक्षम नेतृत्वाची गरज आहे. लोकशाहीचे भविष्य गोंधळाच्या आवाजात नाही, तर कामाच्या, निर्णयाच्या, आणि सत्याच्या उच्चारात आहे.



वंचित बहुजन आघाडी बेलापूर तालुका महासचिव : राहुल शिरसाठ यांना वाढदिवसानिमित्त दैनिक महावृत्त दीपोत्सव अंक भेट देऊन कल्याणराव हनवते (सहसंपादक) तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्ष : शोभाताई कांबळे यांच्यासह महिला मंडळ तसेच बोध्दाचार्य : संजय झनके गुरुजी यांनी हार्दिक शुभेच्छा देतानाचे क्षणचित्र

# चला..जगण्याची दिशा बदलू या..!!

एक नीतिमान,सुसंस्कृत आणि सुशिक्षित माणूस आपल्या आजूबाजूला पसरलेला भ्रष्टाचार आणि अराजकता सहन करू शकत नसल्याने त्यावर निर्भीडपणे बोलण्याची लिहण्याची जबाबदारी स्वतः च्या हातात घेण्याचे ठरवतो. आपण भारतीय नागरिक असाल तर हे कायमचे लक्षात ठेऊया. की अज्ञानावर विज्ञानाने मात केली.तरी आम्ही ही समजून घेत नाही.लिंबू–मिरची खायची असतात,टू व्हीलर,फोर व्हीलरला किंवा घरच्या दरवाजाला बांधण्यासाठी नसतात.घरात मांजर पाळायची असते,मांजर आडवी गेली कि काही वाईट होत नाही.उलट उंदरांपासून नुकसान होण्याचे टळते.मानवाला शिंक येणे हा नैसर्गिक प्रकार आहे. शिंकल्याने काही अघटीत होत नाही किंवा काही अडचणीही येत नाहीत.भूत झाडावर राहत नाही,झाडावर पक्षी राहतात.चमत्कार असा काही नसतो.प्रत्तेक गोष्टी मागे विज्ञान असते आणि आहे प्रत्येकाला कारण आहे.ज्या लोकांना अंग मेहनत करायची नसते तेच हे लोक.बुवा,बाबा,महाराज लोक खोटे असतात आणि आहेत.करणी,जादू टोणा काही नसते हे भ्याड लोकांच्या मनाचे खेळ आहेत. जादू–टोणा करून ग्रहाची दिशा बदलणारे हे ढोंगी बाबा: वारा,ढगांची दिशा बदलून पाऊस का पाडत नाहीत...?.

अहमदाबाद अपघाताचे विमान उड्डाणानंतर ६२५ फूट अंतरावर कोसळले.दोन्ही इंजिन एकाच वेळी निकामी झाले! पक्ष्यांच्या धडकेमुळे दोन्ही इंजिन एकाच वेळी बंद होऊ शकत नाहीत.इंधन टाकीच्या मुख्य स्विचपासून इंजिनला पुरवठा पाईपमध्ये बसू शकणारे इंधन इंजिन फक्त ३०–४० सेकंद चालू ठेवू शकते.या काळात,सुमारे ६२५ फूट उड्डाण शक्य आहे. म्हणून,लांब उड्डाणासाठी निघण्यापूर्वी, १,२६,००० लिटर इंधन भरले गेले आणि इंधन टाकीचा मुख्य स्विच बंद केला गेला.तपासादरम्यान,इंधन टाकी आणि मुख्य स्विच इत्यादी देखील तपासल्या जातात. त्यामुळे,यात बाह्य दहशतवादी असण्याची शक्यता नाही.म्हणूनच या अपघातात बरेच लोक वाचू शकले असते,परंतु १,२६,००० लिटर इंधनाचा स्फोट टाळणे कठीण होते.पूर्ण तपासणीशिवाय,अशा विमानाला लांब प्रवासावर पाठवता येत नाही आणि तपासणीमध्ये,संपूर्ण इंधन पुरवठा लाईनची सविस्तर तपासणी करणे अनिवार्य असते,नव्हे आहे तपासणीनंतर, विमानातील कर्मचारी देखील तेथे पोहोचू शकत नाहीत,इंधन पुरवठा लाईन ही ग्राउंड स्टाफची जबाबदारी आहे. म्हणून,तपासणी दरम्यानच कोणीतरी इंधन पुरवठा लाईनचा मुख्य स्विच बंद केला होता.

यज्ञ,होम महापूजा करून मंत्राने ग्रहाची दिशा बदलणारे हे मनुवादी ढोंगीबाबा, महाराज वाऱ्याची,ढगांची दिशा बदलू शकत नाही.खरे तर पृथ्वी ही स्वत:क्षणा,क्षणाला दिशा बदलत असते. नवसाने,व्रताने,पुजेने, नैवैद्याने,बळीने,देणगीने,प्रसन्न होऊन फळ देतो देव,म्हणजे देव लाच घेऊन प्रसन्न होईल का?. म्हणूनच विज्ञान वाचा आणि अज्ञान दूर करा.मानवाचा ज्या दिवशी जन्म झाला तोच दिवस,तीच वेळ आपल्यासाठी शुभ असते. जन्माला येताना कधीच मुहूर्त पाहिला जात नाही.व मरतानाही कधीच मुहूर्त पाहिला जात नाही.कोणीच पाहणार नाहीत.तरी सुद्धा बहुसंख्य माणसांचा संपूर्ण जीवनभर मुहूर्त पाहण्यात वेळ जातो.सगळेच दिवस,सर्वच वेळ शुभ असतात व आहेत.फक्त इच्छाशक्ती प्रबळ असावी. आपल्यासाठी.सर्वच दिवस सर्वच वेळ शुभ आहे.कुंडल्या पाहून लग्नांचे मुहूर्त काढले जातात तरी अनेक स्त्रियाना वैधव्य का येते. व पुरूष विधूर का होतात?. पत्रिका व कुंडली जुळवून लग्न झालेल्या जोडप्यांचे घटस्फोट का होतात. तर काही अकाली मृत्यू होतात असे का?. आजकाल ९५ टक्के विवाह हे मुहूर्तानुसार वेळेवर लागत नाहीत तरी मुहूर्ताचा आग्रह का धरावा?.मुहूर्त पाहून निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या सर्व उमेद्वारांपैकी एकच निवडून येतो आणि बाकीचे आपटतात.असे का घडते.....?. एकालाच मुहूर्त शुभ होता काय ?.बाकी त्या मुहूर्त सांगणाऱ्याच्या विरोधात बोलत का नाही. कुठेच ओरड का होत नाही. आहे की नाही लक्षात घेण्यासारखी गोष्ट. म्हणूनच आता विचार करा आणि चला..जगण्याची दिशा बदलू या..

शुभ मुहूर्तावर मूल जन्माला घातल्यास शिक्षण न घेता वैज्ञानिक,राष्ट्रपती,पंतप्रधान होईल काय?. आज मूल शुभ मुहूर्ताला जन्माला घालणे विज्ञानामुळे शक्य झाले आहे.अंबानीच्या जन्म मुहूर्ताला जन्माला आलेली व्यक्ती.ती पण अंबानीसारखी करोडपती का झाली नाही?.उच्च शिक्षित डॉक्टर,इंजिनियर उद्योजक,आपल्या कार्यालयाचे बांधकाम करतांना,व्यवसायास प्रारंभ करतांना मूहूर्त पाहूनच सर्व करतात.तरी सुद्धा कित्येकांना अपयश येते. असे क?. कारण :शुभमुहूर्त हे थोतांड आहे सत्य नव्हे.ज्यांचा स्वतः वर विश्र्वास नसतो,तेच लोकं अशा गोष्टींवर विश्र्वास ठेवतात.मुहूर्त पाहणारी पेशवाई नष्ट झाली.आणि कधीही मुहूर्त न पाहणारी ब्रिटिशशाही अख्खा भारत देश गिळून बसली.स्वतः वर व स्वकर्तृत्वावर विश्र्वास ठेवा.चांगले कर्म हेच देव–ईश्र्वर माना.जर कोणता पंडित,ज्योतिषी,बुवा,बापू,कापु,झापु महाराज,साधू ,साध्वी तथा वास्तूशास्त्र विशारद शुभमुहूर्तावरच सर्व काही केल्यास तथा वास्तूशास्त्राप्रमाणेच बांधकाम केल्यास यश येईल असे सांगत असतील तर स्टॅंम्प पेपरवर लिहून देण्यास सांगा.यश न आल्यास नुकसान भरपाईचा दावा ठोकेल असे सांगा.ते तुमच्या जवळही फिरकणार नाहीत.कारण त्यांनाही माहित असते हे सर्व थोतांड आहे.जर तुमचं मन साफ असेल व तुमच्यात प्रयत्न करण्याची क्षमता असेल. तर तुमच्यासाठी कोणतीही वेळ ही 'शुभ मुहूर्तच' असते.चला तर आजपासून शुभ–अशुभ या चक्रात न पडता विज्ञानवादी होऊ या आणि चला..जगण्याची दिशा बदलू या.याची सुरुवात स्वतःपासून करावी लागेल.

शेवटी एक विचारावे वाटते,अहमदाबाद विमान अपघातात मृत्यू झालेल्या लोकांची ओळख कशी झाली.कारण त्यांचे चेहरे संपूर्ण जळले होते.त्यांची ओळख जात धर्म पाहून तर झालीच नाही.झाली ती डी एन ए (उछ–) चाचणीमुळे म्हणजेच बघा जग कुठे चालले आणि आपण कुठे?.तरी आपण विज्ञानाचा जयजयकार करत नाही.अज्ञान अंधश्रद्धा मोठी असल्याचे गर्वा ने सांगतो त्याच्यामुळे वाचलो ही सांगतांना लोक काय म्हणतील यांची लाज वाटली नाही..चला..जगण्याची दिशा बदलू या..!!

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# देशात दिवसेंदिवस अग्निसुरक्षेची पायमल्ली होत आहे;हे गोव्यातील अग्नी कांडवरुन स्पष्ट होते.

उत्तर गोव्यातील पणजी पासून २५ किमी अंतरावर असलेल्या अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेनया गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइट क्लबला शनिवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला,तर १६ जण गंभीररित्या जखमी झाले.डान्स फ्लोअरवर फोडलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे सांगितले जाते आणि ही आग तेथील व्यवस्थापनेच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचे सिद्ध होते.डान्स फ्लोअरवर आग लागली तेव्हा तिथे किमान १०० जण उपस्थित असल्याचे सांगितले जाते.यातील काहीजणांनी स्वतःला वाचविण्याच्या प्रयत्नात स्वयंपाकघराकडे धाव घेतली आणि घात झाला ही भयावह घटना पाहून अंगावर शहारे येतात. आपण देशातील अनेक राज्यांमध्ये खाजगी स्थळी व शासकीय स्थळी मोठमोठे अग्नी कांड होतांना पहातो तरीही राज्य सरकारे किंवा केंद्र सरकार अग्नी सुरक्षेच्या बाबतीत अजुन पर्यंत सतर्क नसल्याचे स्पष्ट दिसून येते.गोव्यातील नाइट क्लबमध्ये सरकारने घालून दिलेली संपूर्ण नियमावलीची पायमल्ली करून क्लब मालक,भागीदार, व्यवस्थापक आणि इतर व्यवस्थापकीय कर्मचारी हे क्लब चालवीत होते ही बाब स्पष्ट होते.याच अनुषंगाने सरकारने मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला.कारण नाइट क्लब नियमांची पायमल्ली करून चालवित असल्याचे उघडकीस आले आहे.नियमांची पायमल्ली फक्त गोव्यातच नाही तर देशातील इतरही भागात किंवा राज्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते.देशात अनेक अग्नी तांडव होतांना आपण पहातो.परंतु अग्नी सुरक्षेच्या दृष्टीने अजुनही आपल्या जवळ अत्याधुनिक सुविधा नाहीत किंवा पाहिजे त्या प्रमाणात कर्मचारी नसल्याचे सुध्दा दिसून येते.गोव्यातील नाइट क्लबमध्ये लागलेली आग १०० टक्के रोखता आली असती, जर क्लब मालक किंवा तेथील व्यवस्थापनाने अग्नि सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले असते तर.आज क्लब मालकाच्या व तेथील व्यवस्थापनेच्या चुकीमुळे २५ लोकांचा बळी गेला व १६ जण गंभीररित्या जखमी झाले.यात क्लबमधील स्वयंपाकघरात काम करणारे कामगार असल्याचे सांगितले जाते.



ही अत्यंत दुर्दैवी व गंभीर बाब आहे.यात प्रशासनाचीही चुक राहु शकते कारण अग्नि सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाने दर महिन्याला क्लबचे ऑडिट घ्यायला हवे होते. परंतु प्रशासनाचे दुर्लक्ष व क्लब मालकाची आणि व्यवस्थापनाची मनमानी यामुळेच क्लबमध्ये आग लागली व या अग्नी तांडवात निरअपराधांचा बळी गेला त्यामुळे या घटनेला क्लब मालक व व्यवस्थापन जेवढे जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार गोवा प्रशासन आहे असे मला वाटते. देशातील अनेक प्रशासकीय इमारती, हॉस्पिटलमध्ये आपण आगी लागलेल्या पाहिल्यात यात अनेकांचा किंवा चिमुकल्यांचा बळी सुध्दा गेला तरीही देशातील राज्य सरकारे अग्नी सुरक्षेच्या बाबतीत सतर्क झाल्याचे दिसून येत नाही ही देशाची व राज्यांची शोकांतिका म्हणावी लागेल.ज्या ठिकाणी सुरक्षेचे उपाय नाही त्याठिकाणी अचानक आग लागणे ही वेगळी बाब आहे.परंतु ज्या ठिकाणी आग लागु शकते आणि त्यावर नियंत्रणाचे उपाय कोणते याची जाणीव आपणाला असतांना सुध्दा आगडोंब निर्माण होतो हे तर आश्र्चर्यच म्हणावे लागेल.हा क्लब अग्नि सुरक्षेचे संपूर्ण नियम धाब्यावर ठेवून क्लब मालक सौरभ लुथरा चालवीत होता. असेही सांगितले जाते की अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेन असलेल्या या क्लब जवळ अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रही नव्हते.त्यामुळे प्रश्र्न निर्माण होतो की इतके वर्षांपासून सुरू असलेल्या या क्लब जवळ अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र का नाही याची चौकशी गोवा प्रशासनाने आतापर्यंत का केली नाही? असाही प्रश्र्न उपस्थित होतो.या क्लबच्या अग्नितांडवाला मालक व व्यवस्थापन जितके जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार गोवा प्रशासन सुध्दा आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.कारण अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र नसने आणि गोवा प्रशासन डोळे बंद करून क्लब सुरू असलेला पहात आहे ही तर प्रशासनाची मोठी चुकीच म्हणावी लागेल.क्लबवरील सरकारची कठोर कारवाई पहाता क्लब मालक सौरभ लुथरा व त्यांच्या साथीदारांनी विदेशात पलायन केल्याचे सांगितले जाते.त्यामुळे प्रश्र्न उपस्थित होतो की, अग्नी तांडव होताच हे फरार कसे काय झाले? याचीही चौकशी सरकारने केली पाहिजे.असेही सांगितले जाते की गौरव लुथरा व सौरभ लुथराच्या क्लबचे अवैध जाळे देशातील अनेक राज्यांमध्ये असल्याचे सांगितले जाते त्यावर सरकार वेळ न करता बुलडोझर ॲक्शन घेत ही अत्यंत चांगली गोष्ट आहे याचे मनापासून स्वागत.परंतु देशातील राज्य सरकारांनी अशा गैर जबाबदार क्लब किंवा प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या वेळीच मुसक्या आवळल्या तर अशाप्रकारचा आगडोंब टाळता येईल. गोवा हे पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी नामांकित राज्य आहे.त्यामुळे बर्च बाय रोमियो लेननाइट क्लबची भीषण अग्नी दुर्घटना पहाता,पुढे चालून अशाप्रकारच्या भयावह दुर्घटना होणार नाही याची गोवा प्रशासनाने व सरकारने जाणीवपूर्वक काळजी घेतली पाहिजे. गोवा सरकारला कसिनो उद्योगापासुन मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो.परंतु आता प्रश्र्न उपस्थित होतो की बर्च बाय रोमियो लेन नाइट क्लबच्या दुर्घटनेचा कसिनो उद्योगावर विपरीत परिणाम तर होणार नाही याची भिती वाटत आहे.त्यामुळे सरकारचे कसिनोकडे लक्ष लागले आहे.मांडवीत सध्या सहा कसिनो जहाज कार्यरत असल्याचे सांगितले जाते. क्लबमधील अग्नी तांडव पहाता,कसिनो जहाजांमधुन आणीबाणीच्या वेळी लोकांना बाहेर काढणे हा सध्याच्या परिस्थितीत चिंतेचा विषय बनला आहे. कारण आगीसारखी दुर्घटना घडल्यास लोकांना जिवाच्या आकांताने मांडवी नदीत उड्या माराव्या लागतील आणि ही जिवीत हाणी मोठी होवू शकते.त्यामुळे वाढत्या आगीच्या घटना पहाता सरकार सतर्क रहाने गरजेचे आहे. ज्या दुर्घटना आपण रोखू शकतो अशा घटना क्लब मालक किंवा इतर व्यावसायिकांनी स्वतः हुन रोखल्याच पाहिजे यासाठी सतर्कता बाळगुन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे सरकारने घालून दिलेल्या नियमांचे पालन होत आहे किंवा नाही हे पहाने स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे क्लब मालक किंवा इतर कोणतेही खाजगी किंवा शासकीय स्थळे असो अग्नी सुरक्षेची पायमल्ली होणार नाही याची जबाबदारी सर्वांनीच घ्यायला हवी. तेव्हाच आपल्याला आगीच्या घटना रोखता येईल.आज देशातील अनेक शहरांमध्ये मोठमोठ्या गगनचुंबी इमारती उभ्या आहेत किंवा होत आहेत. परंतु येवढ्या उंचीवरील आग विझविण्यासाठी आपल्याजवळ अजून पर्यंत अत्याधुनिक साधने उपलब्ध नाहीत सोबतच अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याने अग्निशमन विभागाला अनेक कठीण समस्यांचा सामना सुध्दा करावा लागतो.या संपूर्ण घटनांचे आकलन करून देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी कठोर नियमावली तयार करून अग्नी सुरक्षांची तयारी करावी. कारण छोट्याशा चुकीमुळे किंवा हलगर्जीपणामुळे मोठ्या दुर्घटना केव्हाही ओढावु शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे पर्यटकांनी सतर्क रहावे,सुरक्षित रहावे आणि येणाऱ्या दुर्घटना टाळाव्या. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# महाराष्ट्र सरकार आणि मंडळाविरोधात ॲड. यतिन ठोले मार्फत प्रविष्ट करण्यात आली

विशेष प्रतिनिधी संभाजी नगर – राज्यातील सर्व विधानसभेच्या आमदारांच्या अध्यक्षेतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा अंतर्गत बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिति गठित करण्याबाबत च्या दि.०९.०९.२०२५ आणि दि. ०४.११.२०२५ रोजी शासन निर्णया विरोधात ॲड. यतिन आय. ठोले यांच्या मार्फत प्रविष्ट करण्यात आली,ज्याची सुनावणी येत्या दि. १७ /१२/ २०२५ रोजी (स्टॅम्प क्र.३४५४७/२०२५) अशी मे.उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर होणार आहे.

इमारत आणि इतर बांधकाम कामगारांसाठी भारत सरकारमार्फत इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे नियमन आणि सेवा शर्ती कायदा,१९९६) असा या कामगारांच्या कल्याणाकरिता तयार करण्यात आला. तसेच या कायद्यासोबत इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर कायदा,१९९६ असा कायदाही भारत सरकारकडून तयार करण्यात आला.उपकर कायदा,१९९६ मार्फत बांधकाम मालकास एकूण बांधकामाच्या रक्कमेचे एक टक्का उपकर म्हणून जमा करणे बंधनकारक करण्यात आले.महाराष्ट्र प्रदेशात इमारत आणि इतर बांधकाम कामगारांचे करोडोने संख्या आहे.संबंध महाराष्ट्रामध्ये बांधकामाचे कामेही प्रचंड प्रमाणात आहे. एक टक्का उपकर रक्कम म्हणून जमा होणारी वर्ष २००७ पासूनची रक्कम हजारों करोड रूपयात आहे. या दोन कायद्यांची अंमलबजावणी व्हावी,म्हणून महाराष्ट्र प्रदेशात महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची स्थापना वर्ष२००७पासून करण्यात आली.या दोन कायद्यांची अंमलबजावणी सदर कायद्याने करण्याची जबाबदारी आणि अधिकार फक्त मंडळास देण्यात आले आहे.

मंडळामार्फत इमारत आणि इतर बांधकाम कामगारांची नोंदणी आणि नुतनीकरणाची कामे हाताळणे आणि उपकर म्हणून जमा झालेल्या रक्कमेमार्फत या कामगारांसाठी कल्याणकारी कामास खर्ची करणे असे उपक्रम मंडळाचे आहे. महाराष्ट्र सरकारमार्फत दि. ०९ /०९ / २०२५ च्या शासन निर्णयानुसार बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समितीची रचना करण्यात आली आणि या समितीवर प्रत्येक विधानसभेचे आमदार अध्यक्ष म्हणून तसेच सरकार ज्या व्यक्तीस या समितीवर नियुक्त करेल, त्यांना सदस्य म्हणून नेमण्याचे निर्णय घेण्यात आले. तसेच विभागीय संनियंत्रण समितीची रचनाही करण्याचे शासनाने निर्णय घेतले.

याच प्रकारे दि. ०४ / ११ / २०२५ च्या शसन निर्णयानुसार दि. ०९/०९/२०२५ च्या शासन निर्णयामध्ये तुरळक बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

एकंदर दोन्ही कायद्यानुसार कायद्यातील कल्याणकारी बाबी हाताळण्याचे अधिकार त्याच कायद्यातील तरतुदीनुसार मंडळाकडे राहणार अशी रचना असूनही शासनाने दोन शासन निर्णयानुसार संनियंत्रण समितीची रचना करून सरकारमार्फत हे सर्व अधिकार त्यांच्याकडे घेणार असल्याने एक रिट याचिका (स्टॅम्प क्र. ३४५४७ /२०२५) अशी मे.उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगरकडे बांधकाम कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी श्रमिक संघटना नामे स्वतंत्र मजदूर संघ (अध्यक्ष-अमोल गायकवाड), क्रांती-ज्योत कामगार संघटना (अध्यक्ष-दिपक थोरात), स्वराज्य असंघटीत कामगार संघटना (अध्यक्ष-निलेश उजगरे), महाराष्ट्र राज्य क्रांतिकारी जनरल कामगार यूनियन(अध्यक्ष-दिलीप म्हस्के), श्रमिक असंघटीत कामगार संघटना (अध्यक्ष-सुभाष अनावडे)मार्फत महाराष्ट्र सरकार आणि मंडळाविरोधात ॲड. यतिन आय. ठोले मार्फत प्रविष्ट करण्यात आली, ज्याची सुनावणी येत्या दि. १७ /१२/ २०२५ रोजी मे. कोर्टात होणार आहे,अशी माहिती अमोल गायकवाड राज्यातील सर्व बांधकाम कामगारांना देत आहेत.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात दहा दिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास कार्यशाळेचे उद्घाटन

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील करिअर आणि प्लेसमेंट सेल व इंटरनॅशनल बिजनेस मशीन आणि मॅजिक बस इंडिया फाऊंडेशन,पुणे यांच्या वतीने दि.०९ ते १९ डिसेंबर २०२५ या दरम्यान युवा सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास कार्यशाळेचे उद्घाटन झाले.याप्रसंगी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्रमुख पाहुणे एआय ट्रेनर रतन वर्मा प्रोफाईल ऑफिसर अक्षय पोटभरे,करण धायगुडे, टीपीओ अनिल बिराजदार ,कार्यशाळा संयोजक डॉ.महेश करळे,सहसंयोजक डॉ.रोहिणी शिंदे,डॉ.संगीता जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,युवा सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास अत्यंत महत्त्वाची बाब आहे.म्हणूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदरील कौशल्य विकास आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेतील ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी जास्तीत-जास्त फायदा घ्यावा.भविष्यकाळात विद्यार्थ्यांना नोकरीसाठी योग्य दिशा मिळेल,त्याचा निश्चितच फायदा होईल.

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास वाढणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यता आणणे यासाठी सातत्याने संस्थेमार्फत कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले जाते.अशा कार्यशाळेमुळेच संस्थेचा जॉब ड्राईव्ह निश्चितच वाढेल.तसेच विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण,कृत्रिम बुद्धिमत्ता,सायबर सुरक्षा यांचे ज्ञान मिळण्याबरोबर त्यांच्यामधील सॉफ्ट स्किल वाढणे हेही अत्यंत महत्त्वाचे आहे.अशा या कार्यशाळेमधूनच विद्यार्थी घडतात.विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले.

अनिल बिराजदार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.प्रास्ताविक डॉ.संगीता जाजू यांनी केले तर आभार डॉ.महेश करळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.आशा बोराडे यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि १५० विद्यार्थी या कार्यशाळेस उपस्थित होते.

# नवरीसह बनावट लग्न लावून देणाऱ्या चौघा विरुद्ध गुन्हा दाखल.




केज/प्रतिनिधी –२ लाख रुपये घेवून दीपेवडगाव येथील मंदिरात लग्न लावलेली नवरी कोद्री येथे सासरी आल्यानंतर अवघ्या ३ तासानंतरच पळून जाताना पकडल्या मुळे बनावट लग्नाचा खेळ उघडकीस आला आसून नवरीसह चौघा विरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.या प्रकारणातील नवरी पळून जाताना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केली आहे.

केज तालुक्यातील दीपेवडगाव येथील मूळ रहिवाशी व छत्रपती संभाजीनगर येथे सध्या राहणारे प्रल्हाद गुळभीले या एजंटा च्या मध्यस्थीने

अंबाजोगाई तालुक्यातील कोद्री येथील नागेश देविदास जगताप वय ३६ वर्षे याचे कडुन १ लाख ९० हजार रुपये दि ६ डिसेंबर रोजी घेवून दुपारी १२-३० वाजता दिपेवडगांव येथील हनुमान मंदिरात नागेश जगताप व प्रिती शिवाजी राऊत यांचा विवाह लावण्यात आला. त्या नंतर वधू, वरासह सर्व नातेवाईक कोद्री येथे गेले आसता सयंकाळी साडेचार वाजण्याच्या दरम्यान नववधू प्रिती राऊत हिने शौचाला जाण्याच्या बहाण्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता गावातील एकाने तिला पहिले व ही माहिती नागेश जगताप आणि त्यांचे नातेवाईकांना दिली. तिचा शोध घेत असताना नातेवाईकांना नववधू प्रीती ही डिघोळअंबा बस स्थानकाजवळ मिळून आली. तेव्हा तिला तु का पळुन चालली आहेस ? त्या नंतर नागेश जगताप व प्रीती राऊत सह नातेवाईक युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गेले. पोलीसांनी प्रिती हिची चौकशी केली असता प्रिती राऊत व तिच्या सोबत आलेली मावशी नामे सविता रा. पुणे माया सतिष राऊत रा. चाकण

पुणे व प्रल्हाद गुळभीले यांनी संगनमत करून नागेश जगताप यांच्याशी लग्न लावून देतो म्हणून १ लाख ९० हजार रुपयाची फसवणूक केल्या प्रकरणी नागेश जगताप यांच्या फिर्यादी वरून युसुफवडगाव पोलिसात एजेंट सतिष प्रल्हाद गुळभीले,नवरी प्रिती शिवाजी राऊत, तिची मावशी सविता, व माया राऊत या चौघा विरुध्द फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आसून सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे हेपुढील तपास करीत आहेत.

नोटरी ही चौकशीच्या फेऱ्यात..

या प्रकरणी एजन्ट प्रल्हाद गुळभीले, नवधुच्या २ मावशी सह केज येथील नोटरी करून देणारे नोटरी व लग्नाआधीच पतिकडील नावाचे बनावट आधारकार्ड तयार करणारे संगणक तंत्रज्ञ

हे सर्वजण चौकशीच्या फेऱ्यात अडकले आसून या सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे यांनी दिली आहे.

नवरीला पोलिस कोठडी

नववधू प्रीती राऊत हिला केज न्यायालया समोर पोलिसांनी हजर केले आसता तीला १० डिसेंबर पर्यंत ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# हरंगुळ (बु.) व वरवंटी परिसरात एम आय डी सी चे दूषित पाणी; नागरिकांच्या जीवितास धोका

लातूर - हरंगुळ (बु.) मंदार वस्ती आणि मौजे वरवंटी




(बसवंतपूर) परिसरातील नागरिकांना लातूर चखऊ मधून नाल्याद्वारे येणाऱ्या दूषित पाण्याचा प्रचंड त्रास होत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम दिसत आहेत. या गंभीर समस्येबाबत भारतीय जनता पक्षाच्या नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की,एम आय डी सी मधील सांडपाणी थेट नाल्यात सोडले जात असल्याने ते लोकवस्तीमध्ये मिसळत आहे. परिणामी नागरिकांच्या अंगावर पुरळ, एलर्जी, त्वचारोग यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. विशेषतः महिला आणि लहान मुलांचे आरोग्य गंभीर धोक्यात आल्याचे नमूद केले आहे.

डॉ. चाकुरकर यांनी सांगितले की, नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही योग्य तो परिणामकारक पाणी व्यवस्थापन केले गेलेले नाही. त्यामुळे दूषित पाणी थेट लोकवस्तीत येत असून नागरिकांच्या जीवितास प्रत्यक्ष धोका निर्माण झाला आहे.

निवेदनात पुढे असा उल्लेख करण्यात आला आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण अधिनियम १९८७ अंतर्गत चखऊ वर कठोर कारवाई करावी. तसेच दूषित पाणी बाहेर जाण्याची व्यवस्था तात्काळ बंद करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेवटी, डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# सांगलीत कामगारांचा प्रचंड उद्रेक डॉ.शंकरदादा माने यांच्या नेतृत्वाखाली निळा बावटा व रिपब्लिकन सेनेचे संयुक्त आंदोलन!



सांगली- दिनांक ४ डिसेंबर २०२५ भांडीपेटीतील निकृष्ट दर्जाची भांडी,बायोमेट्रिक पूर्ण करूनही भांडी न मिळणे, कामगार नोंदणी व नूतनीकरणातील प्रचंड विलंब, घरकुल व इतर लाभांचे अर्ज प्रलंबित,कॉन्ट्रॅक्टरची दादागिरी आणि पुणे कार्यालयाकडून होत असलेली निष्क्रियता या गंभीर प्रश्नांवर आज सांगली येथे बहुजन संघटित कामगार संघटना निळा बावटा कामगार व रिपब्लिकन सेना सांगली जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जोरदार आंदोलन छेडण्यात आले.निकृष्ट भांडी,नोंदणीतील विलंब,घरकुल अर्ज प्रलंबित कामगार न्यायासाठी शंकरदादा माने यांचे रणशिंग! कामगारांचा न्यायधोरणासाठी सांगलीत जंगी मोर्चा निळा बावटा आणि रिपब्लिकन सेना एकत्र! कामगार हक्कांसाठी सांगली पेटली डॉ.शंकरदादा माने आणि पदाधिकाऱ्यांचा तीव्र संघर्ष! सांगलीत हजारोंचा न्यायनाद 'निळा बावटा' व रिपब्लिकन सेनेचे संयुक्त आंदोलन कामगारांच्या हक्कासाठी सांगलीत तीव्र आंदोलन 'निळा बावटा' व रिपब्लिकन सेनेचे एकत्रित रणघोष!

कामगारांच्या हक्कांसंदर्भातील ९ प्रमुख मागण्यांसह आजचे आंदोलन अत्यंत शांततामय पण तीव्र झाल्याचे चित्र होते. कामगारांचा हक्क–आमचा संघर्ष, न्याय नाही तर आंदोलन निश्चित, निळा बावटा–न्यायाची हमी आणि रिपब्लिकन सेना–अत्याचाराला ठाम प्रतिकार या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कामगारांच्या प्रमुख मागण्या

– निकृष्ट भांड्यांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई

– बायोमेट्रिक पूर्ण केलेल्या सर्व कामगारांना तत्काळ दर्जेदार भांडी वितरित करणे

– कॉन्ट्रॅक्टरची दादागिरी थांबवून कायदेशीर कारवाई

– सर्व प्रलंबित नोंदणी/नूतनीकरण १५ दिवसांत पूर्ण करणे

– शिष्यवृत्ती, साधनसामग्री, वैद्यकीय व अपघात सहाय्य यांचे अर्ज तात्काळ निकाली काढणे

– वर्षानुवर्षे प्रलंबित घरकुल अर्जांची तपासणी करून पात्रांना मंजुरी

– पुणे कार्यालयाकडे पाठवलेले सर्व अर्ज तातडीने सांगलीत मागवून स्थानिक स्तरावर निर्णय घेणे

। आंदोलनाचे नेतृत्व व उपस्थिती

या आंदोलनात खालील मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.डॉ.शंकरदादा माने संघटनाप्रमुख व रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष,शहाजी केंगार (प्रदेशाध्यक्ष),संतोष वानखडे (प्रदेश उपाध्यक्ष),संदीप धुमाळ (पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष),राखी शिंदे (जिल्हा महिला अध्यक्षा),बापूसाहेब करडे (जिल्हाध्यक्ष),आकाशवाणी काटे (तालुकाध्यक्ष) तसेच सिद्धनाथ माने,आकाश लोंढे,सविता माने, रेश्मा वानखडे,अमर माने,जालिंदर मोहिते, सुभाष मराठे,प्रीती दबडे,अमोल कांबळे, प्रज्ञा गायकवाड आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कामगारांच्या न्यायासाठी हे आंदोलन लढाऊ पद्धतीने पार पडले असून,पुढील काळात मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.

# पत्नीला वाचविताना पतिचाही विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू






केज/प्रतिनिधी –केज तालुक्यातील वाघेबाभुळगाव शिवारात विहिरीतून पाणी काढताना पाय घसरून विहिरीत पडलेल्या पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीचाही, पत्नीसह विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली.

वाघेबाभुळगाव शेजारीच असलेल्या पवारवाडी येथे शेतकरी भास्कर विनायक पवार,पत्नी अल्का पवार व मुलगा ऋषिकेश हे तिघेही वाघेबाभूळगाव शिवारातील शेतात खुरपणी करीत होते. सायं. ४-३० वाजण्याच्या दरम्यान अल्का पवार या पिण्यासाठी विहिरीतून पाणी काढत असताना त्यांचा पाय घसरून त्या विहिरीत पडल्या. त्यांना वाचविण्यासाठी त्यांचे पती भास्कर पवार यांनीही विहिरीत उडी मारून पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र अल्का पवार वय ४० वर्षे व भास्कर पवार वय ४५ वर्षे या दोघा पती,पत्नीचाही विहिरीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्यांचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढून नांदूरघाट येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. मयताचा भाऊ सुग्रीव शंकर पवार यांच्या खबरेवरून केज पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आसून.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उप निरीक्षक अशोक सोनवणे हे करीत आहेत.

# स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



केज/प्रतिनिधी–जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ठीक ९ ते २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबिराचे हे ३१ वे वर्ष आहे. या रक्तदान शिबिराचे काम केज येथील डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच त्यांची टीम पाहणार आहे.

तरी बहुसंख्य रक्तदात्यांनी या रक्तदान चळवळीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच स्वामी विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक व माध्यमिक विभाग, केज, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज तसेच स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.